E-mail :- dmcencr@thanecity.gov.in दूरध्वनी :- ०२२-२५४२५६७७

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

महानगरपालिका भवन, सर सेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे-४००६०२.

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नगर पथ विक्रेता समिती सदस्य निवडणूक सार्वजनिक सूचना

**[पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील नियम १६ (१) व संलग्न अनुसूची एक (३)(क) अन्वये]**

पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील नियम १६ (१) अन्वये नगर पथ विक्रेत्यांमधून नगर पथ विक्रेता समिती सदस्यांची निवडणूक घेणे आवश्यक आहे. पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम, २०१६ अंतर्गत नियम-११(२) (ख-एक) अन्वये ८ (आठ) नगर पथ विक्रेता समिती सदस्य नगर पथ विक्रेत्यांमधून निवडणुकीद्वारे निवडून द्यावयाचे असून त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक, विकलांग व्यक्ती व खुला प्रवर्ग या संवर्गाच्या प्रतिनिधित्वाचा उल्लेख केला आहे. तसेच, एक तृतीयांश आरक्षण हे महिलांना देण्याचा उल्लेख असून नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडील दि. १३ एप्रिल २०२३ रोजीच्या पत्रान्वये आरक्षण सोडत करण्याच्या पध्दतीनुसार सर्वसाधारण गटाकरीता असलेल्या ३ (तीन) जागांपैकी १ (एक) जागा महिलाकरीता राखीव ठेवण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०८ नोव्हेंबर २०२३ रोजी नगर पथ विक्रेता समिती सदस्यातील उर्वरित २ (दोन) महिला राखीव जागांकरीताचे आरक्षण सोडत चिठ्ठी पद्धतीने घेण्यात आली. यामध्ये १ (एक) जागा अनुसूचित जातीकरीता व १ (एक) जागा विकलांग व्यक्तीकरीता निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने नगर पथ विक्रेत्यांमधून नगर पथ विक्रेता समिती सदस्यांची निवडणूक खाली दर्शविलेल्या ८ (आठ) जागांकरीता घेण्यात येईल.

| अ.क्र. | संवर्ग | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण गट (महिला राखीव - १) | ३ |
| २ | अनुसूचित जाती (महिला राखीव) | १ |
| ३ | अनुसूचित जमाती | १ |
| ४ | इतर मागास वर्ग | १ |
| ५ | अल्पसंख्यांक | १ |
| ६ | विकलांग व्यक्ती (महिला राखीव) | १ |
| | **एकूण** | **०८** |

ज्या अर्थी पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र. काआ / औसं / प.वि. / जिल्हाधिकारी, ठाणे / को.वि./आदेश/२०२४/ कार्या.-९/८५०७, दि. १८ जुलै २०२४ चे पत्रान्वये माझी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. म्हणून मी, प्रबोधन मवाडे, निवडणूक निर्णय अधिकारी नोंदणीकृत पथ विक्रेत्यांच्या अंतिम मतदार यादीतील पथविक्रेत्यांना कळवित आहे की, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नगर पथ विक्रेता समिती सदस्य निवडणूक घेणेकरीता खालीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहिर करीत आहे.

# नगर पथ विक्रेता समिती सदस्य निवडणूक कार्यक्रम

| अ.क्र. | विवरण | दिनांक व दिवस | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | दि. २६/०३/२०२५ बुधवार | - | ठाणे महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग समिती कार्यालय व अधिकृत संकेत स्थळ (www.thanecity.gov.in) |
| २ | नामनिर्देशन पत्राचे वाटप करणे. | दि. २७/०३/२०२५ गुरुवार ते दि. २८/०३/२०२५ शुक्रवार | सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | ठाणे महानगरपालिका मुख्यालय, तळमजला |
| ३ | नामनिर्देशन पत्र स्विकारणे | दि. ०१/०४/२०२५ मंगळवार ते दि. ०२/०४/२०२५ बुधवार | सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | ठाणे महानगरपालिका मुख्यालय, तळमजला |
| ४ | प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करणे | दि. ०३/०४/२०२५ गुरुवार | सकाळी ११.०० वा. पासून संपेपर्यंत | ठाणे महानगरपालिका मुख्यालय |
| ५ | वैध नामनिर्देशन यादी प्रसिध्द करणे | दि. ०३/०४/२०२५ गुरुवार | छाननीनंतर | ठाणे महानगरपालिका मुख्यालय, ठाणे. |
| ६ | आक्षेप अर्ज स्विकारणे | दि. ०४/०४/२०२५ शुक्रवार | सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | ठाणे महानगरपालिका मुख्यालय |
| ७ | आक्षेप अर्जांवर सुनावणी घेणे | दि. ०७/०४/२०२५ सोमवार | सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | ठाणे महानगरपालिका मुख्यालय |
| ८ | नामनिर्देशन पत्र मागे घेणे | दि. ०८/०४/२०२५ मंगळवार | दुपारी ३.०० वाजेपर्यंत | ठाणे महानगरपालिका मुख्यालय |
| ९ | माघारी नंतरची नामनिर्देशन अंतिम यादी प्रसिध्द करणे | दि. ०८/०४/२०२५ मंगळवार | दुपारी ३.०० नंतर | ठाणे महानगरपालिका मुख्यालय |
| १० | मतदान | दि. ११/०४/२०२५ शुक्रवार | सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | संबंधीत प्रभाग समिती कार्यालयामध्ये |
| ११ | मतमोजणी व निकाल जाहिर करणे | दि. ११/०४/२०२५ शुक्रवार | सायंकाळी ५.०० वाजेनंतर | ठाणे महानगरपालिका मुख्यालय |

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अनुपस्थितीत सहायक निवडणूक निर्णय अधिकारी हे निवडणूक संदर्भातील कामकाज पाहतील. तसेच, प्रशासकिय बाब उद्धवल्यास उपरोक्त नमुद कार्यक्रम आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचे मान्यतेने पुर्ननियोजित करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

नोंदणीकृत नगर पथ विक्रेत्यांच्या प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या संबंधित प्रभाग समिती कार्यालय, ठाणे महानगरपालिका मुख्यालयातील सुचना फलक तसेच महापालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर **(www.thanecity.gov.in)** पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

स्थानिक प्राधिकरण क्षेत्रातील पथ विक्रेत्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नगर पथ विक्रेता समितीच्या सदस्यांच्या निवडणूका घेणेकरीता नियम १६ मधील अनुसूची एक मधील कार्यपध्दतीचे अवलंबन करणेत येईल. निवडणूक संदर्भातील अधिक माहितीकरीता ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागाकडे संपर्क करावा.

आयुक्त, ठाणे महानगरपालिका व नगर पथ विक्रेता समिती सदस्य निवडणूक निर्णय अधिकारी, यांच्यामार्फत सर्व मतदारांना आवाहन करणेत येते की, सदर निवडणूकीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन सदर निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यास महानगरपालिकेस सहकार्य करावे.

Prabodhan Nagan Mawade

Digitally signed by Prabodhan Nagan Mawade
DN: c=IN, o=Personal, postalCode=410210, l=Raigad, st=Maharashtra, street=Omkar, Flat No 10 Sector 21 Kharghar Navi Mumbai, Kharghar, Panvel Maharashtra India 410210, title=7756, 2.5.4.20=95e3b24f0c9e70fe78bf1ee70969122c402b7676228bb55151afd4611644d94a, serialNumber=d2260709c9ba22bcae55bdc2021676525fd580cf9ceab7d3ede871ba1927c430, email=pnmawade@gmail.com, cn=Prabodhan Nagan Mawade
Date: 2025.03.26 17:49:13 +05'30'

**ठिकाण** :- ठाणे.
**दिनांक** :- २६/०३/२०२५

(प्रबोधन मवाडे)
**निवडणूक निर्णय अधिकारी,**
**नगर पथ विक्रेता समिती सदस्य निवडणूक सन-२०२५**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**